# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे – ४११००७

# Savitribai Phule Pune University
Ganeshkhind, Pune - 411007


## परिपत्रक

**विषय: सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये/विद्यापीठ विभागातील (अव्यवसायिक) विद्यार्थ्यांसाठी विविध शिष्यवृत्ती योजना शैक्षणिक वर्ष २०२३–२४ साठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज पाठविण्याच्या मुदतवाढीबाबत.**

विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय/विद्यापीठ विभागातील पदवी व पदव्युत्तर अव्यवसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिक दुर्बल घटक, गुणवत्ताधारक, मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठामार्फत उपरोक्त शिष्यवृत्ती/अर्थसहाय्य योजना सुरू केलेल्या आहेत. सदर योजनांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२३–२४ या वर्षात प्रवेशित विद्यार्थी/विद्यार्थीनी यांच्याकडून संबंधित महाविद्यालय/विद्यापीठ विभाग यांच्यामार्फत ऑनलाईन **(Online)** पध्दतीने दि. ०६ मार्च, २०२४ पर्यंत अर्ज करण्याबाबत विद्यापीठ परिपत्रक क्र. ३५/२०२४, दि. २१/०२/२०२४ अन्वये कळविण्यात आले होते.

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना पुन:श्च कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालय / संस्थांनी अद्यापही त्यांच्या महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांने अर्ज भरले नसेल अशा पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती/अर्थसहाय्य योजनेसाठी **दि. ११/०३/२०२४** पर्यंत ऑनलाईन **(Online)** पध्दतीने अर्ज करण्यास सूचित करावे. तसेच महाविद्यालय/विद्यापीठ विभागाने विद्यार्थ्यांनी ऑनलाईन **(Online)** पध्दतीने भरलेल्या अर्जांची छाननी करून आपल्या महाविद्यालयाच्या **PUNCODE** वरून दि. १३/०३/२०२४ पर्यंत Online पद्धतीने विद्यापीठास सादर करावी.

यापुढे याकरीता कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव

गणेशखिंड, पुणे–७ )
संदर्भ :शै.प्रवेश/७७७ )
दिनांक : ०६/०३/२०२४ )

प्रत : माहिती व योग्य त्या कार्यवाही करीता

मा. विभागप्रमुख, विद्यापीठ विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
मा. प्राचार्य, विद्यापीठाशी सलग्नित सर्व व्यवसायिक व अव्यवसायिक महाविद्यालय.

आपणास विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देऊन विहित मुदतीत कार्यवाही करण्यात यावी.